पोलीस आयुक्तालय, नवी मुंबई CB 22/2026

प्रेसनोट

गुन्हे शाखा, नवी मुंबई दिनांक ०४/०४/२०२६

''वेश्या व्यवसायातुन ०२ पिडीत महिलांची गुन्हे शाखेतील पोलीसांनी केली सुटका''

पोलीस आयुक्त, नवी मुंबई, श्री.मिलिंद भारंबे, सह पोलीस आयुक्त, श्री.संजय येनपुरे, अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, श्री.दीपक साकोरे, पोलीस उप आयुक्त, गुन्हे शाखा, श्री.सचिन गुंजाळ यांनी नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाचे परिसरात अनैतिक व्यापार, अवैध धंदे यांच्यावर कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत.

त्याअनुषंगाने अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्षाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. पृथ्वीराज घोरपडे यांना दिनांक ०३/०४/२०२६ रोजी त्याचे गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, ''गोल्डन किंग सलुन आणि स्पा, प्लॉट नंबर सी/१७, शॉप नंबर ११, सेक्टर १६, निलकंठ धाम, रोडपाली, कंळबोली, पनवेल येथील मॅनेजर/मालक हा बॉडी मसाजसाठी असलेल्या ग्राहकांना ५५००/— रूपये दर सांगुन कमी जास्त रक्कम घेवुन मसाजच्या नावाने तेथे असलेल्या महिलांकडुन जबरदस्तीने वेश्या व्यवसाय करून घेत आहे.''

वपोनि/घोरपडे यांनी त्यांना मिळालेल्या बातमीप्रमाणे बनावट ग्राहकास ''गोल्डन किंग सलुन आणि स्पा'' येथे पाठवले. बनावट ग्राहकाच्या सांकेतीक इशाऱ्यावरून पथकाने स्पावर छापा टाकला. त्याठिकाणी ०२ पिडीत महिला वेश्यागमनाकरीता ठेवलेल्या मिळून आल्या. स्पाची मॅनेजर/मालक (१) समीर उर्फ अलीगोर अब्दुलहफिज अन्सारी, वय—३३ वर्षे (२) परी उर्फ सलमा अलीगोर अन्सारी, वय—२६ वर्षे, व्यवसाय— स्पा मालक, दोन्ही सध्या रा. रूम नं. बी ४०४/ग्रीन व्यु सोसायटी प्लॉट नं. २/३, सेक्टर ०२, फेज १, तळोजा, मुळ रा. जिल्हा नेनैताल, राज्य उतराखंड यांनी आपसात संगणमत करून ०२ पिडीत महिला यांना बॉडी मसाज करण्याचे नावाने प्राप्त करून, नमुद शॉप हा वेश्या व्यवसायाकरीता वापरून, पिडीत मुलींना वेश्या व्यवसायासाठी बनावट ग्राहकास दाखवून व्यवसायाचा मोबदला म्हणून ४५००/— रूपये स्विकारले. म्हणुन त्यांचे विरूध्द कंळबोली पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि नंबर ११०/२०२६ भा.न्या.सं.कलम १४३ (३), ३(५) सह अनैतिक व्यापार प्रतिबंध कायदा कलम १९५६ चे कलम ३, ४, ५ अन्वये दिनांक ०३/०४/२०२६ रोजी गुन्हा दाखल केला आहे. सदर गुन्हयातील २ आरोपींना अटक केली असुन त्यांची दिनांक ०६/०४/२०२६ रोजी पावेतो पोलीस कोठडी मंजुर आहे. गुन्हयाचा पुढील तपास कंळबोली पोलीस ठाणे करत आहे.

सदरची उल्लेखनिय कारवाई सहा.पोलीस आयुक्त, धर्मपाल बनसोडे, AHTU, गुन्हे शाखा यांचे मार्गदर्शनाखाली वपोनिरी/पृथ्वीराज घोरपडे, सपोनि/योगेश देशमुख, सपोनि/राजश्री शिंदे, पोउपनिरी/सरिता गुडे, पोहवा/२५०४ सविता म्हात्रे, पोहवा/२५०४ ज्योती अडकमोल पोशि/२६५४ ठाकुर, पोशि/३०९२ चव्हाण, पोशि/३२३९ पारासुर, पोशि/३४५२ कोलते, पोशि/४५४४ पाटील व चालक पोहवा/हांडे यांनी केली आहे.

★★★★★★★★★★


पोलीस आयुक्तालय, नवी मुंबई
सहाय्यक पोलीस आयुक्त
व
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्ष
गुन्हे शाखा, नवी मुंबई